ePaper

## महाराष्ट्र हिटलिस्टवर, घातपाताचा कट; आंबिवलीत दहशतवाद्यांना अटक



वर्ष - 6 । अंक - 267 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- उजनी धरणातील पाण्याचे प्रदूषण धोकादायक पातळीवर
- महापालिका निवडणूक विभागाचे वेट अॅण्ड वॉच!
- एकनाथ शिंदेंची मोठी खेळी!


www.mahaenews.com | बुधवार, दि. 11 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'ओसीटी' मशीन खरेदीत घोळ!

## वायसीएममधील रुग्णांच्या जीवाशी खेळ, आ. आण्णा बनसोडे यांचे मुख्यमंत्र्याना पत्र

### 'ओसीटी' मशीन खरेदी चौकशी करण्याची मागणी

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात रुग्णांचे डोळे तपासणीसाठी भांडार विभागाने ऑप्टिकल सुसंगत टोमोग्राफी (ओसीटी) मशीनची खरेदी केली आहे. मशीन खरेदी करताना भांडार उपायुक्त, वैद्यकीय अधिष्ठाता, बॉयोमेडीकल इंजिनिअर यांनी ठेकेदाराशी केलेल्या वाटाघाटीमुळे ओसीटी मशीन खरेदीत घोळ झाला असून ठेकेदाराने स्पेसिफिकेशन बदलून मशीनचा पुरवठा केला आहे. त्यामुळे ओसीटी मशीन खरेदीची चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे आमदार आण्णा बनसोडे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगरविकास सचिव यांना पत्र देत ओसीटी मशीन खरेदीत झालेल्या घोटाळ्याची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कारवाईची मागणी केली आहे. त्यानुसार नगरविकास विभागाने चौकशीचे आदेश दिले आहेत.**

महापालिकेच्या भांडार विभागाने वायसीएम रुग्णालयातील पीजीआय नेत्र विभागाच्या मागणीनूसार ऑप्टिकल सुसंगत टोमोग्राफी



(ओसीटी) मशीन खरेदीची निविदा प्रक्रिया राबविली होती. भांडार विभागाने जेम पोर्टलवर सुमारे 90 लाख रुपयाचे मशीन खरेदीस GEM/2022/B/2133845 निविदा प्रसिध्द केली होती. त्यानूसार आद्या प्रॉपर्टीज आणि आर्थरॉन टेक्नॉलॉजीज हे दोन ठेकेदार पात्र ठरले. L1 आद्या प्रॉपर्टीज ठेकेदाराने 55 लाख 88 हजार दराने HORVITZ LTD, या कोरियन कंपनीचे तर L2 आर्थरॉन टेक्नॉलॉजीज आणि एंटरप्राइजेस ठेकेदाराने 63 लाख रुपये दराने ZEISS, या जर्मन कंपनीचे मशीन दिले जाणार होते.

महापालिकेच्या भांडार विभागाने 'ओसीटी' मशीन खरेदीसाठी 15U (मायक्रॉन) रिझोल्यूशनपेक्षा अधिक चांगले स्पेसिफिकेशन मागितले होते. मात्र, संबंधित आद्या प्रॉपर्टीज ठेकेदाराने 20U (मायक्रॉन) रिझोल्यूशनचे मशीन दिले आहे.

### आयुक्तांची द्विधा मनस्थिती..

वायसीएम रुग्णालयासाठी सुमारे सव्वा कोटी खर्च करुन २० हाय वॅक्युम सक्षन मशीन खरेदी करण्यात आल्या. मात्र, खरेदीसाठी महापालिकेने दिलेल्या स्पेसिफिकेशननूसार मशीन न देता, ठेकेदाराने बदलून दिल्या. हाय वैक्युम सक्षन मशीन खरेदीत टेक्निकल स्पेसिफिकेशननुसार निविदेतील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचा ठपका पुरवठादारावर ठेवण्यात आला. त्यामुळे खरेदी केलेल्या मशीन आणि निविदेतील नमूद स्पेसिफिकेशन तपासून आयुक्त शेखर सिंह यांनी मे. सेबर्ड सिस्टम्स आयएनसी ठेकेदाराचा पुरवठा आदेश रद्द केला आहे. त्याप्रमाणेच 'ओसीटी' मशीन खरेदीत मनपाने दिलेले स्पेसिफिकेशन आणि ठेकेदाराचे स्पेसिफिकेशनमध्ये खूपच तफावत आहे. असे असताना देखील आयुक्त शेखर सिंह हे संबंधित ठेकेदाराला पाठिशी घालत आहेत. त्यामुळे स्पेसिफिकेशन बदल्याने एका ठेकेदाराचा पुरवठा आदेश रद्द केला.

त्यामुळे ठेकेदाराने दिलेले 'ओसीटी' मशीन उपकरणाचे स्पेसिफिकेशन आणि मनपा स्पेसिफिकेशन यामध्ये खुपच तफावत आढळून आले आहे. याबाबत बॉयोमेडीकल इंजिनिअर आणि डॉक्टरच्या टीमने 'ओसीटी' मशीन स्पेसिफिकेशनमध्ये तफावत असतानाही ठेकेदाराशी अर्थपुर्ण संबंधाने समाधानकारक अहवाल दिला आहे. दरम्यान, वायसीएमच्या नेत्र विभागात ओसीटी मशीनने रुग्णाच्या डोळ्याची तपासणी करण्यात येणार आहे. 'ओसीटी' मशीन खरेदीत मनपाने दिलेले स्पेसिफिकेशन आणि ठेकेदाराचे स्पेसिफिकेशनमध्ये खूपच तफावत आहे.

# महानगरपालिकांमध्ये स्वीकृत सदस्यांची संख्या वाढवली..!

## मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय: आता महापालिकेत 5 नाही तर 10 स्वीकृत नगरसेवक

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज पार पडली. या बैठकीत काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यात मोठ्या महानगरपालिकांमध्ये स्वीकृत नगरसेवकांची संख्या 10 करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे लहान महानगरपालिकांमध्ये सदस्य संख्येच्या 10 टक्के स्विकृत



नगरसेवक होऊ शकतात.

मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार आता महापालिकेत 5 नाही तर 10 स्वीकृत नगरसेवक असतील. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या मोठ्या महापालिकेत किमान दहा स्वीकृत सदस्य असतील.

### पिंपरी-चिंचवड महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदी 10 जणांची निवड करता येणार

पिंपरी। राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत महानगरपालिकांमध्ये नामनिर्देशित पालिका सदस्यांच्या संख्येत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार आता महापालिकांमध्ये एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के किंवा दहा स्वीकृत नगरसेवक यांपैकी जी संख्या छोटी असेल त्यानुसार स्वीकृत सदस्यांची निवड केली जाणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचा विचार करता आता १० स्वीकृत नगरसेवकांची निवड करावी लागणार आहे. सध्या ही संख्या ५ वर होती. राज्य सरकारच्या निर्णयामुळे स्वीकृत नगरसेवकांच्या संख्येत दुप्पट वाढ होणार आहे. महापालिकेत एकूण सदस्य संख्येच्या दहा टक्के स्वीकृत नगरसेवक होऊ शकतात किंवा दहा स्वीकृत नगरसेवक स्वीकृत म्हणून निवडता येतील. यापैकी जी संख्या छोटी असेल त्यानुसार स्वीकृत सदस्यांची निवड करण्याच्या सुधारणेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आता महापालिकांमध्ये ५ नाही तर १० स्वीकृत नगरसेवक असतील. पिंपरी-चिंचवड महापालिकेचा विचार करता महापालिकेत सध्या ५ स्वीकृत नगरसेवक निवडण्याची कायदेशीर तरतूद होती. आता निवडणुका झाल्यानंतर १० स्वीकृत नगरसेवक निवडता येतील. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक होण्याची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पाणीप्रदूषण धोकादायक!

## उजनी धरणातील पाण्यामुळे अंगाला खाज येत असल्याची तक्रार

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**देशोदेशीच्या स्थलांतरित पक्ष्यांचे उजनी धरणातील सर्वात मोठे आश्रयस्थान जल प्रदूषणाच्या विषारी विळख्यात सापडले आहे. उजनी जलाशयाच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने धरणाच्या आश्रयाला लाखोंच्या संख्येने आलेल्या स्थलांतरित व स्थानिक पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आला आहे. सध्या धरणातील पाण्याची प्रदूषण पातळी वाढल्याने पाण्याचा रंग हिरवा गर्द झाला आहे.**



जलाशयाच्या पाण्याला उग्र वास येत असून या पाण्यात वावर करत असलेले मच्छीमार आणि शेतकरी या पाण्यामुळे अंगाला खाज येत असल्याची तक्रार करीत आहेत.गेल्या ४० वर्षांच्या इतिहासात डिसेंबरअखेर आणि जानेवारी महिन्यात सर्वाधिक १०० टक्के जलसाठा उजनी धरणात आहे. दरवर्षी देशोदेशींच्या सीमा ओलांडून उजनीच्या जलाशयातील जैववैविध्यावर पोटापाण्याची सोय करण्यासाठी विणीच्या हंगामासाठी

### उजनी धरणाला प्रदूषित पाण्याचा विषारी विळखा

**»जलाशयाच्या पाण्याला उग्र वास येत असून या पाण्यात वावर करत असलेले मच्छीमार आणि शेतकरी या पाण्यामुळे अंगाला खाज येत असल्याची तक्रार करीत आहेत.गेल्या ४० वर्षांच्या इतिहासात डिसेंबरअखेर आणि जानेवारी महिन्यात सर्वाधिक १०० टक्के जलसाठा उजनी धरणात आहे. दरवर्षी देशोदेशींच्या सीमा ओलांडून उजनीच्या जलाशयातील जैववैविध्यावर पोटापाण्याची सोय करण्यासाठी विणीच्या हंगामासाठी पाहुणे पक्षी येतात. सध्या उजनी धरणावर रोहित, चित्रबलाक, विविध करकोचे, पट्टकदंब, राखी बगळे, मोरघार, तपकिरी डोक्याचा करकोचा अशा विविध जाती प्रजातीच्या पक्ष्यांनी आणि त्यांच्या गजबजाटाने उजनीचा परिसर खुलला आहे. पर्यटक, हौशी छायाचित्रकार, अभ्यासक, विद्यार्थी व निसर्गप्रेमींची पावले उजनीकडे वळत आहेत. उजनी धरण परिसर पर्यटनासाठी एक आकर्षक केंद्र होत असतानाच धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पक्ष्यांच्या अधिवास प्रवण भागालाच प्रदूषित पाण्याचा विषारी विळखा पडला आहे.**

उजनी धरणाच्या पाण्यामध्ये प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे पर्यावरणासह उजनीच्या प्रदूषणाबाबत तातडीने उपाययोजना करावी, असे प्रा. भास्कर गटकुळ यांनी सांगितले.

# अबब... पुण्यात एका दिवसात गोळा झाला ३५ टन कचरा!

## ‘जी-20’ परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोहीम

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

‘जी-२०’ परिषदेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने शहरातील ७७ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याअंतर्गत २७ हजार ८१९ किलो सुका कचरा, ३ हजार ७२४ किलो ओला कचरा, ४ हजार किलो राडारोडा, असा एकूण ३५ हजार ५४३ किलो (३५ टन) कचरा संकलित करण्यात आला.

लोकसहभागातून सार्वजनिक स्वच्छता करण्यासाठी महापालिकेच्या वतीने या मोहिमेचे रविवारी आयोजन करण्यात आले होते. शहरातील सर्व पंधरा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध सार्वजनिक रस्ते, वस्ती परिसर, शहरातील ऐतिहासिक स्थळे आणि पर्यटनस्थळे अशा विविध ठिकाणी या स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.




### महापालिका प्रशासनाचा स्वच्छतेवर भर

**»शहरामध्ये आगामी आठवड्यात ‘जी-२०’ परिषद होणार आहे. त्यामध्ये विविध देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर स्वच्छ आणि सुंदर शहर असा शहराचा संदेश जगभर पोहोचावा, या दृष्टीने महापालिका प्रशासनाने स्वच्छतेवर भर दिला आहे. त्या दृष्टीने महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे स्वच्छता मोहिमेचे रविवारी सकाळी सात ते नऊ या वेळेत आयोजन केले होते.**

शहरामध्ये आगामी आठवड्यात ‘जी-२०’ परिषद होणार आहे. त्यामध्ये विविध देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर स्वच्छ आणि सुंदर शहर असा शहराचा संदेश जगभर पोहोचावा, या दृष्टीने महापालिका प्रशासनाने स्वच्छतेवर भर दिला आहे. त्या दृष्टीने महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे स्वच्छता मोहिमेचे रविवारी सकाळी सात ते नऊ या वेळेत आयोजन केले होते.

# नवीन धोरणानुसार राज्यातील दहा हजार शिक्षकांच्या बदल्या



**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

नवीन बदली धोरणानुसार राज्यातील संवर्ग एक आणि संवर्ग दोनमधील मिळून एकूण दहा हजार ९० शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या झाल्या आहेत. नवीन बदली धोरणानुसार झालेली ही पहिलीच बदली प्रक्रिया आहे. एकूण बदल्यांमध्ये संवर्ग एकमधील सहा हजार ६९० आणि संवर्ग दोनमधील तीन हजार ४०० शिक्षकांचा समावेश आहे.राज्यातील एकूण बदल्यांमध्ये पुणे जिल्ह्यातील ५९९ शिक्षकांचा समावेश आहे. दरम्यान, आणखी तीन आणि चार या दोन संवर्गातील शिक्षकांच्या बदल्या बाकी आहेत. या बदल्यांमुळे तीन वर्षांच्या खंडानंतर यंदा पहिल्यांदाच शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या झाल्या आहेत.यापैकी पहिल्या वर्षी शिक्षकांच्या बदल्यांचे जुने धोरण रद्द केल्याने तर, त्यानंतरचे दोन वर्षे कोरोना संसर्गामुळे जिल्हांतर्गत बदल्यांची प्रक्रिया राबविता आली नव्हती.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांमध्ये पुणे जिल्ह्यातील ६४१ शिक्षकांचा समावेश आहे. जिल्ह्यातील एकूण बदल्यांमध्ये संवर्ग एकमधील ३८८ तर, संवर्ग दोनमधील २५३ शिक्षकांच्या बदल्या झाल्या असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी सांगितले.

# महापालिका निवडणूक विभागाचे वेट अ‍ॅण्ड वॉच!

## आगामी निवडणूक किती सदस्यीय पद्धतीनुसार याबाबत कोणताही आदेश नाही



**पिंपरी । महाईन्यूज ।**

विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार याद्या जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांचाच आधार घेऊन महापालिका निवडणुकीसाठी प्रभागांनुसार (वॉर्ड) याद्यांचे विभाजन केले जाणार आहे. मात्र, आगामी निवडणूक किती सदस्यीय पद्धतीनुसार याबाबत कोणताही आदेश नसल्याने महापालिका निवडणूक विभाग सध्या ‘वाट पहा’च्या भूमिकेत आहे.

महापालिकेची पंचवार्षिक मुदत गेल्या वर्षी १३ मार्च रोजी संपली. त्यासाठी फेब्रुवारीमध्येच निवडणूक होणे अपेक्षित होते. मात्र, कोरोना, लॉकडाऊन, ओबीसी आरक्षण, प्रभाग पद्धतीत बदल, राज्यातील सत्ता बदल, न्यायप्रविष्ट याचिका अशा विविध कारणांनी महापालिका निवडणूक वर्षापासून लांबणीवर पडली आहे.

तेव्हापासून प्रशासक नियुक्त आहेत. येत्या १३ मार्च रोजी प्रशासकीय कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होईल. त्यापूर्वीच निवडणूक होईल, अशी अपेक्षा प्रशासनासह आजी-माजी नगरसेवकांसह इच्छुकांनाही होती. मात्र, निवडणुकीसाठी अद्याप कोणतीही हालचाल नसल्याने महापालिका निवडणूक विभागासह इच्छुकांमध्येही शांतता आहे. सर्वांनाच निवडणुकीबाबतच्या पुढील आदेश वा सूचनांची प्रतिक्षा आहे. आता पाच जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. त्या अद्याप महापालिका निवडणूक विभागाकडे आलेल्या नाहीत. महापालिका निवडणुकीसाठी त्या याद्यांची विभागणी प्रभागानुसार केली जाते.

### प्रभाग तीनचा की चारचा?

**तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने महापालिका निवडणूक तीन सदस्यीय प्रभाग पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात नगरसदस्य संख्याही वाढवली होती. त्यानुसार प्रभाग रचना करून मतदार याद्यांची विभागणीही महापालिका निवडणूक विभागाने केली होती. मात्र, राज्यात सत्तांतर झाले आणि भाजप व एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील गट (आता बाळासाहेबांची शिवसेना) यांचे सरकार आले. शिंदे मुख्यमंत्री व भाजपचे देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री आहेत. त्यांच्या सरकारने महाविकास आघाडी सरकारचा तीन सदस्यीय प्रभाग पद्धती व वाढीव सदस्यांबाबतचा निर्णय रद्द केला आहे. त्यामुळे आगामी निवडणूक २०१७ प्रमाणे अर्थात फडणवीस मुख्यमंत्री असताना घेतलेल्या चार सदस्यीय प्रभाग पद्धतीप्रमाणे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, त्याबाबत अद्याप कोणताही आदेश अथवा सूचना महापालिका निवडणूक विभागाला प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आगामी निवडणूक तीन की चार सदस्यीय पद्धतीने होणार, याबाबत ठामपणे कोणीही सांगू शकत नाही.**

### दृष्टिक्षेपात लोकसंख्या व संभाव्य प्रभाग

- - २०२१ मध्ये जनगणना न झाल्याने निवडणुकीसाठी २०११ ची लोकसंख्या गृहित
- २०११ मध्ये शहराची लोकसंख्या १७ लाख २७ हजार ६९२ होती
- महापालिकेची निवडणूक १२८ सदस्यांसाठी होणार अशी सद्यःस्थिती
- तीन सदस्यीय पद्धतीने निवडणूक झाल्यास प्रभाग संख्या ४६
- तीन सदस्यांचे ४५ प्रभाग आणि चार सदस्यांचा एक प्रभाग असेल
- चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक झाल्यास प्रभाग संख्या ३२ असेल
- असे असेल आरक्षण
- महिलांसाठी एकूण जागांच्या ५० टक्के अर्थात १२८ पैकी ६४
- ओबीसींसाठी एकूण जागांच्या २७ टक्के
- अनुसूचित जाती, जमातींसाठी (एससी, एसटी) लोकसंख्येच्या प्रमाणात
- ओबीसी, एससी, एसटी महिलांना त्यांच्या कोट्यातील ५० टक्के
- खुल्या जागांवरही महिला, ओबीसी, एससी, एसटी व्यक्ती निवडणूक लढवू शकते
- एकूण प्रभाग व त्यातील जागांमधून सोडत काढून आरक्षण निश्चित केले जाते

#### दहा वर्षात वाढले मतदार

वर्ष / पुरुष / महिला / इतर / एकूण
२०१२ / ६,३१,६५५ / ५,२०,९३४ / ... / ११,५२,५८९
२०२३ / ७,७८,०८६ / ६,६८,७२२ / १४० /

# राजमाता जिजाऊ जयंती सामूहिक साजरी करावी!

## आमदार महेश लांडगे: महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सूचना



### महाराष्ट्राचा इतिहास नव्या पिढीमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करा

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांची जयंती शासकीय, अशासकीय तसेच सर्व अस्थापनांमध्ये साजरी करण्यात यावी. त्यासाठी संबंधित विभागांना सूचना द्याव्यात. महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास नव्या पिढीमध्ये रुजवण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत.याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, हिंदवी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांचा इतिहास आणि विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने जिजाऊ जयंती सामूहिकपणे साजरी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती संवर्धनासह शिव-शंभूंचे विचार तळागाळात आणि घराघरांत पोहोचवणे काळाची गरज आहे. हे संस्कार आणि विचार जनमाणसांत रुजवण्यासाठी शिवरायांच्या मनात स्वराज्याची ज्योत प्रज्ज्वलीत करणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची जयंती शाळा, घर, शासकीय, निम शासकीय कार्यालये तसेच खासगी अस्थापनांच्या ठिकाणी साजरी करण्यात यावी, अशी आमच्यासह अनेक शिवप्रेमी संस्था, संघटनांची मागणी आहे. त्यासाठी सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

> “राजमाता जिजाऊ यांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेचा मनोदय केला. तो पूर्ण करण्याकरिता छत्रपती शिवरायांवर तसे संस्कार केले. स्वातंत्र्य, स्वराज्य, प्रजेचे हित, धर्मरक्षण याकरिता अखंड प्रयत्न करणाऱ्या राजमाता संपूर्ण जगभरातील माता-भगिनींसाठी आदर्श आहेत. त्यामुळे राजमाता जिजाऊंचे कार्य आणि इतिहास भावी पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी जिजाऊंची जयंती सार्वजनिक आणि सामूहिकरित्या साजरी करावी, अशी आमची मागणी आहे.
>
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# लग्न समारंभात चोरट्यांनी पळवलेले २६ लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत

## हिंजवडी पोलीस तपास पथकाची कामगिरी

**पिंपरी । महाईन्यूज ।**

पिंपरी लग्न समारंभात चोरीला गेलेले तब्बल २६ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने हिंजवडी पोलिसांनी जप्त केले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून हिंजवडी पोलिसांच्या तपास पथकाने ही कामगिरी केली आहे. रितीक महेश सिसोदिया (वय २०), वरुण राजकुमार सिसोदिया (वय २३), शालु रगडो धपानी (वय २८), शाम लक्ष्मिनारायण सिसोदिया (वय ३८) सर्व राहणार मध्यप्रदेश अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी पोलीस ठाणे हद्दीतील ऑर्कीड हॉटेलमध्ये ६ डिसेंबर २०२२ रोजी लग्न होते. यावेळी चोरट्यांनी या लग्नात तब्बल ६५ तोळे सोने व ९ लाख रुपयांची रोकड लंपास केली होती. पोलिसांनी हॉटेलमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली असता दोन अनोळखी इसम हे फिर्यादीच्या आईची पर्स घेऊन गेल्याचे दिसले. पोलिसांनी कसून तपास चालु केला असता आरोपी हे मध्यप्रदेशच्या राजगढ जिल्ह्यातील असल्याचे समजले. त्यानुसार हिंजवडी पोलिसांचे एक पथक मध्यप्रदेशमध्ये गेले तेथे त्यांनी तपासासाठी १७ दिवस वास्तव्य केले.

यावेळी त्यांनी रितीक व वरूण यांनी त्यांचे साथीदार शालु व शाम यांच्या सोबत मिळून चोरी केली असून त्या चोरीतील काही मुद्देमाल हा त्यांच्या घरी म्हणजे बोडा, जि. राजगढ येथे असल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांनी आरोपींचे नातेवाईक व शेजारी यांच्याकडून माहिती घेत स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीच्या घरी छापा टाकला. त्यावेळी तेथे ५२ तोळे वजनाचे २६ लाख रुपयांचे दागिने सापडले. आरोपी मात्र तेथून फरार झाले होते.

## संपादकीय »

# पडद्याआडचे खलनायक!

*कोणतीही कला आणि त्यावर आधारित उद्योग बहरण्यासाठी गुंतवणूक आणि सवलतींइतकेच महत्त्वाचे असते ते समाजातील अनुकूल वातावरण.*

सुष्टांचा दुष्टांवरला विजय हे हिंदी चित्रपटसृष्टीचे जन्मजात सूत्र राहिले आहे. खलनायकाचा खात्मा करणारा परमप्रतापी नायक कितीही 'चाकलेटी चिमणा' असला तरी भारतीय भाबडे मन त्याला स्वीकारते. अर्थात हे सारे घडते पडद्यावर...प्रेक्षकांसमोर! पडद्यावर व्हिलनलोकांची हालत बेकार करणारे बॉलिवुड पडद्यामागे मात्र खऱ्याखुऱ्या खलनायकांपुढे नांगी टाकते, असाही इतिहास आहेच. भरपूर गल्ला जमवणारा हा 'सिनेमा धंदा' गुन्हेगारी अधोविश्वालाही 'आपला' वाटत राहिला. त्या कचाट्यातही या सिनेमाधंद्याने अनेक वर्षे काढली. परंतु, ही सारी संकटे चंदेरी दुनिया एक तर सहन करत होती किंवा त्यातून मार्ग काढत होती.

या दुनियेसमोर सध्या उभे राहिलेले आव्हान मात्र चांगलेच दुर्घट आहे. हिंदी चित्रकर्त्यांसमोर आता कुणी परका खलनायक उभा नाही, प्रेक्षकच पाठ करुन उभा राहिला आहे! त्या प्रेक्षकवर्गाला चित्रपटगृहाकडे कसे खेचून आणायचे, या चिंतेने हिंदी सिनेसृष्टीला ग्रासलेले दिसते. म्हणूनच मुंबईच्या दौऱ्यावर आलेल्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बॉलिवुडच्या तारांगणाने परवा-गुरुवारी अवघड साकडे घातले. -'काहीही करा, पण बॉलिवुडच्या बहिष्काराची समाजमाध्यमांवरची भाषा बंद पाडण्यास मदत करा!' मुख्यमंत्री आदित्यनाथ यांचा दौरा शतप्रतिशत 'व्यावसायिक' होता. महानगरातील दिग्गज उद्योजकांच्या भेटीगाठी घेऊन त्यांनी भरभक्कम गुंतवणुकांची आश्वासने पासोडीत बांधून नेली, असे दिसते. उत्तर प्रदेशात गेली दोनेक वर्षे चित्रनगरी उभी करण्याचे घाटत आहे. मुंबईतील चित्रनिर्मात्यांना तेथे येऊन निर्मिती करण्याचा आग्रह केला जात आहे. असे प्रयत्न करण्यात गैर नाही. पण कोणतीही कला आणि त्यावर आधारित उद्योग बहरण्यासाठी गुंतवणूक आणि सवलतींइतकेच महत्त्वाचे असते ते समाजातील अनुकूल वातावरण. चित्रपटाकडे एक कला म्हणून पाहता येण्याची प्रगल्भता. उत्तर प्रदेशचे काय किंवा अन्य सरकारे काय, ती या दिशेने प्रयत्न करणार का, हा खरा सवाल आहे. बॉलिवुड ही मुंबईची शान. ही मिरास उत्तर प्रदेशात जाणे, काहींना वेदनादायी

# उत्तराखंडच्या 'विकासा'तले संकट..






जोशीमठ हे उत्तराखंडच्या चामोली जिल्ह्यातील शहर ज्या भुईवर वसले तीच मुळात, फार जुन्या काळात होऊन गेलेल्या नैसर्गिक भूस्खलनाचा ढिगारा कालौघात स्थिरावून तयार झाली होती. आज जोशीमठची स्थिती पाहून देश हादरला आहे. एवढी वेळ येऊच कशी दिली गेली हा देशभरातील अनेकांचा प्रश्न आहे. वरुणावत, केदारनाथ, ऋषीगंगा.. आता जोशीमठ अशा आपत्ती भयावह सातत्याने झेलणारा उत्तराखंडचा भाग, पर्यावरणहत्येपायी जन्मठेप भोगण्याच्या मार्गावर आहे.हे अचानक नाही घडले. ते कधी-कसे घडत गेले, का घडत राहिले, हे समजण्यासाठी किमान सन २००० पर्यंत मागे जावे लागेल. उत्तराखंड हे पहाडी राज्य म्हणून उदयास आले, ते हे वर्ष. त्याआधी प्रदीर्घ आणि प्रसंगी हिंसक आंदोलन झाले होते, पण त्या आंदोलनाचे मुख्य कारण म्हणजे, यापुढे इथल्या संसाधनांच्या वापराचे निर्णय आणि त्यावर नियंत्रण आमचेच असू द्या, ही मागणी. ब्रिटिश काळापासून या प्रदेशातील संसाधनांचे शोषणच होत राहिले, तरीसुद्धा इथल्या गढवाली वा अन्य लोकांनी खस्ता खात निसर्गाशी नाते कायम ठेवले होते. चिपको आंदोलनाची हीच जन्मभूमी, टिहरी धरणविरोधी आंदोलनही इथलेच.

राज्यनिर्मितीनंतर मात्र लोकांच्या अपेक्षा वाढल्या. उद्योगांचा वा शेतीचाही विस्तार करण्याची फारशी संधी नसलेल्या या वनाच्छादित, पर्यावरणीयदृष्ट्या नाजूक राज्याला आर्थिक उलाढाल करणे कठीण जाणार होते. तरीसुद्धा इथले भूमिपुत्र लोकप्रतिनिधी निसर्गाशी नाते राखूनच काहीतरी मार्ग काढतील, राज्याच्या प्रगतीसाठी अथक परिश्रम करतील, अशी इथल्या जनतेची आशा होती. राज्यनिर्मितीच्या आधी निसर्गावर अन्याय होत होता, आता शाश्वत, सेंद्रिय, न्याय्य वाढ होणार अशी स्वप्ने होती. तेही साहजिकच, कारण निसर्गापुढे लीन न होता त्यावर वर्चस्व मिळवण्याचा प्रयत्न केल्यास काय होते हे हिमालयीन समुदायांना चांगलेच ठाऊक असते!

### 'मिळते ते घ्या'

मात्र, अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत. अवघ्या २२ वर्षांत १२ वेळा मुख्यमंत्री बदलले, दोनदा राष्ट्रपती राजवट अशी राजकारणाची चौदा रत्ने पाहाणाऱ्या राज्यामध्ये, राजकीय प्रतिभेच्या कमतरतेमुळे शोषणात्मक विकासास ठामपणे विरोध करणाऱ्या विवेकी बहुसंख्यांचा आवाजच हळूहळू दबत गेला. आज निवडणूक जिंकणे हाच कार्यक्रम उरल्यामुळे दूरस्थ सत्ताकेंद्राला पूर्ण वर्चस्व मिळते आहे. कॉर्पोरेट हितसंबंध आणि कॉन्ट्रॅक्टर लॉबींचा सखोल प्रभाव राज्याला भोगावा लागत आहे. केंद्राकडून जाहीर करण्यात आलेल्या 'विकास' धोरणांबद्दल चिंता व्यक्त करण्याची प्राज्ञाच नाही कुणा विवेकी आवाजांची – आता 'मिळते ते घ्या' हेच खरे. गुजरात किंवा उत्तर प्रदेशात जे चालून जाते ते या पर्वतारांगांत चालणार नाही,

# पानमळ्यांची जिद्दीने जोपासना

**तांबूल अर्पण करण्याचा विधी भारतात देवांपासून पितरांपर्यंत आणि पूजेपासून श्राद्धापर्यंत चालत आला आहे. 'पान' हे पृथ्वीवर सांडलेल्या अमृतातून निर्माण झालेल्या नागवेलीचे आहे, असे मानले जाते.**

तांबूल सेवनाबद्दल आयुर्वेदातही बरेच लिहिले गेले आहे. नागवेलीची पाने, चुना, सुपारी, कात, वेलची, लवंग, जायफळ, कस्तुरी, केशर अशा विविध तेरा पदार्थांच्या एकत्रीकरणामुळे पानाच्या विडय़ाला 'त्रयोदशगुणी' असेही म्हटले जाते. एकीकडे धार्मिक विधीत पानसुपारीला पहिला मान असताना दुसरीकडे श्रृंगारिक लावण्या, कवने यांमध्ये विडय़ाचे उल्लेख आढळतात. पूर्वीच्या काळात राजदरबारी विडा उचलण्यावर शौर्याचे मोजमाप होई. नृत्यांगनेची अदाकारी, शायरांचा मुशायरा, संगीताची मैफील, कव्वालीचा मुकाबला, गायनाची जुगलबंदी या गोष्टीही पानविडय़ाशिवाय रंगत नसत. पूर्वीच्या काळी पानांच्या विडय़ांना सार्वजनिक शिष्टाचाराचाच भाग मानले जात असे.

आता काळ बदलला आहे. एका गोष्टीची जागा हळूहळू दुसऱ्या गोष्टीने घेतली आहे. यात पानांच्या विडय़ांचेही स्थान केवळ मानापुरतेच उरले आहे.



परिणामी, नागवेलीच्या पानांच्या उत्पादन घटत चालले आहे. पानमळे आक्रसत आहेत. पूर्वी केवळ पानमळय़ांसाठी प्रसिद्ध असलेल्या गावांची ओळख आता लुप्त होऊ लागली आहे. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात अनेक गावे पूर्वी पानमळय़ांसाठी सर्वदूर विख्यात होती. -काही गावांच्या नावातच पानाचा उल्लेख आना नावापुरताच उरला आहे. उदाहरणार्थ पान मंगरूळ वगैरे.

बदलत्या परिस्थितीनुसार पानमळे आता दुर्मीळ समजले जातात. यात आपल्या पूर्वजांची परंपरा जपण्यासाठी काही गावांमध्ये नव्या पिढीकडून पानमळय़ांची जोपासना होत आहे.

अक्कलकोट तालुक्यातील कडबगावचे महिबूब राजेभाई मुल्ला असो वा पंढरपूर तालुक्यातील देवडे गावचे समाधान सुतार, या मंडळींनी सेंद्रिय पानमळय़ांची जोपासना कायम ठेवली आहे. कष्टाने आणि तेवढय़ाच कौशल्याने केल्या जाणाऱ्या पानमळय़ांतून वर्षभर उत्पन्न घेतले जात आहे. अक्कलकोट तालुका पंचायत समितीचे माजी सभापती असलेले महिबूब मुल्ला यांच्या वडिलांनी यापूर्वी १९६५ ते १९९० या कालावधीत नऊ एकर क्षेत्रात पानमळा फुलविला होता. नंतर त्यात खंड पडला. मात्र अलिकडे करोनाकाळात महिबूब मुल्ला यांनी शेतीकडे पूर्ण लक्ष दिले आणि शेतीनेच त्यांना आर्थिक आधार दिला. त्या अर्थाने करोनाचा प्रादुर्भाव जगासाठी शाप ठरला असताना मुल्ला कुटुंबीयांसाठी वरदानच मानला गेला. कारण करोनाकाळात टाळेबंदीमुळे मुल्ला कुटुंबीयांनी शेतीलाच आधार मानले होते. त्यातूनच तीन एकर क्षेत्रात ध्यास घेऊन पानमळय़ाची निर्मिती झाली. तसे पाहता तीन एकर क्षेत्रात पानमळा करणे

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उद्धव ठाकरेंचे पद बेकायदा!

## शिवसेना कुणाची? शिंदे हेच शिवसेनेचे अध्यक्ष; आयोगासमोर खडाजंगी

**। नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

शिवसेना हे पक्षनाव व धनुष्यबाण या पक्षाच्या निवडणूक निशाणीवरील हक्काबाबत निवडणूक आयोगासमोर सुरू असलेल्या सुनावणीत मंगळवारी शिंदे गटाने शिवसेना पक्षातील घटनाबदल बेकायदा असल्याचा दावा केला. उद्धव ठाकरे यांनी ताब्यात घेतलेले शिवसेनेचे प्रमुखपद व अधिकार घटनाबाह्य असल्याचाही दावा करण्यात आला. दुसरीकडे ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीचा हवाला देऊन न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत निवडणूक आयोगाने निवाडा देऊ नये, अशी मागणी लावून धरली. या प्रकरणाची पुढील सुनावणी आयोगाने १७ जानेवारी रोजी ठेवली आहे.




शिवसेनेत मोठी फूट पाडल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर अर्ज दाखल करीत, शिवसेना हे पक्षनाव व धनुष्यबाण या निशाणीवर हक्क सांगितला आहे; तसेच 'शिवसेना' पक्षप्रमुख ही उद्धव ठाकरे यांची नियुक्तीही बेकायदा ठरवली आहे. मंगळवारी आयोगासमोर या प्रकरणातील पुढील सुनावणी झाली. या वेळी शिंदे गटातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ महेश जेठमलानी व ठाकरे गटातर्फे कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली.

जेठमलानी यांनी उद्धव यांचे शिवसेना पक्षातील पदच बेकायदा असल्याचा दावा केला. 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असताना शिवसेनेची पक्षघटना ही पक्षाचे संस्थापक म्हणून बाळासाहेबांकडेच केंद्रित होती. बाळासाहेबांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या पक्षघटनेत बेकायदा बदल केला. नव्या घटनेनुसार उद्धव यांनी शिवसेनेचे प्रमुखपद स्वत:कडे ठेवले आहे. पक्षातील सर्व अधिकारही आपल्याकडेच एकवटले आहेत. हे बेकायदा आहे,' असे सांगून जेठमलानी यांनी, जुलै २०२२मध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या पक्षाध्यक्षपदी निवड झाल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

शिंदे यांच्या पक्षाध्यक्षपदामुळे उद्धव यांचे पक्षातील पद संपुष्टात आले आहे, असा दावाही त्यांनी केला. उद्धव ठाकरे यांच्यातर्फे बाजू मांडणाऱ्या कपिल सिब्बल यांनी या वेळी सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीकडे लक्ष वेधले. 'सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असल्याने निवडणूक आयोगाने घाई करू नये. जोपर्यंत न्यायालयाचा निर्णय जाहीर होत नाही, तोपर्यंत आयोगाने या प्रकरणात कोणताही निवाडा देऊ नये,' अशी मागणी करतानाच, शिंदे यांनी पक्षाबाबत सादर केलेली कागदपत्रे बनावट असल्याचाही दावा केला.

### 'व्हॅलेंटाईन डे' दिवशी होणार ठाकरे-शिंदे सत्तासंघर्षाची सुनावणी'व्हॅलेंटाईन डे' दिवशी

» ठाकरे विरुद्ध शिंदे यांच्यामधील सत्तासंघर्षाच्या सुनावणीची पुढची तारीख सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. १४ फेब्रुवारीला यासंदर्भात पुढची सुनावणी होणार असून यामुळे राज्याच्या सत्तासंघर्षाचा निकाल पुन्हा लांबणीवर गेला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शिंदे फडणवीस सरकार लवकरच पडेल, असा दावा काही दिवसांपूर्वी केला होता. आज सुनावणीची तारीख जाहीर झाल्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, "१४ फेब्रुवारी हा प्रेमाचा दिवस आहे. त्यामुळे सगळं काही प्रेमाने होईल." अशा मिश्किल भाषेत टिप्पणी केली.

# मच्छिमारांसाठी नुकसान भरपाई धोरण लवकरच आणणार !

## मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**राज्यातील विविध बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांसाठी राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरण लवकरच आणण्यात येणार असल्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.**



मत्स्यव्यवसाय विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या धोरणासंदर्भातील बैठक आज विधानभवन येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव तथा आयुक्त अतुल पाटणे यांच्यासह विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री मुनगंटीवार म्हणाले की मत्स्यव्यवसाय हा रोजगार देणारा व्यवसाय असल्याने शासन या व्यावसायिकांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी पाठिशी असून यासाठीच हे धोरण ठरविण्यात येत आहे. राज्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने तसेच विविध निमशासकीय विभागांमार्फत बांधकाम विषयक विकास प्रकल्प राबविण्यात येतात. अशा प्रकल्पामुळे मच्छिमार बांधब बाधित होत असतात. याशिवाय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या टीसीबी-3 प्रकल्पामुळे सुध्दा काही मच्छिमार बांधव बाधित होणार आहेत. त्यानुषंगाने सर्वकष राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरणाचा व्यापक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये प्रकल्पबाधित मच्छिमारांना नुकसान भरपाई देताना आदर्श मार्गदर्शक प्रणाली वापरण्यात यावी. तसेच व्यावसायिक आणि पारंपरिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्यांना यामध्ये नुकसान झाल्यास भरपाई देण्यात येणार आहे. प्रकल्प बांधकामामुळे मच्छिमारांच्या होणाऱ्या नुकसानीसाठी सहा श्रेणी निश्चित करण्यात याव्यात. असे हि सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

### मत्स्यव्यवसाय हा रोजगार देणारा

» मंत्री मुनगंटीवार म्हणाले की मत्स्यव्यवसाय हा रोजगार देणारा व्यवसाय असल्याने शासन या व्यावसायिकांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी पाठिशी असून यासाठीच हे धोरण ठरविण्यात येत आहे. राज्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या वतीने तसेच विविध निमशासकीय विभागांमार्फत बांधकाम विषयक विकास प्रकल्प राबविण्यात येतात. अशा प्रकल्पामुळे मच्छिमार बांधब बाधित होत असतात. याशिवाय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या टीसीबी-3 प्रकल्पामुळे सुध्दा काही मच्छिमार बांधव बाधित होणार आहेत. त्यानुषंगाने सर्वकष राज्यस्तरीय नुकसान भरपाई धोरणाचा व्यापक आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

# फेऱ्या घटल्या, बिघाड वाढले; एसटी बस सेवेबाबतची धक्कादायक माहिती उघड

**। मुंबई । महाईन्यूज ।**

भविष्यात येणाऱ्या नव्या गाड्यांची स्वप्ने रंगवत असताना सर्वसामान्यांचा वर्तमानातील एसटी प्रवास अडचणीचा आणि त्रासदायक ठरत आहे. गेल्या पाच वर्षांत एसटीच्या सरासरी फेऱ्यांची संख्या निम्म्याने घटलेली आहे. मार्गांतील बिघाडाचा टक्का वाढल्याने पैसे देऊन रस्त्यावर ताटकळण्याची नामुष्की प्रवाशांवर ओढावली आहे. 'मटा'ने मागवलेल्या माहिती अधिकारात एसटी महामंडळाच्या प्रवासीसेवेचे वास्तव उजेडात आले आहे.

सन २०१९ पासून आजपर्यंत एसटी महामंडळात धोरणात्मक निर्णय लांबणीवर पडल्याने त्याचा परिणाम एसटी प्रवाशांवर झाला. जुन्या गाड्यांची देखभाल दुरुस्ती रखडणे, नव्या गाड्यांची कमतरता आणि आयुर्मान पूर्ण गाड्यांतून प्रवासी वाहतूक यांमुळे एसटी प्रवासी अनधिकृत पर्यायाकडे वळत आहेत. सन २०१७-१८ मध्ये महामंडळाने एकूण सरासरी एक कोटी ६६ लाखांहून अधिक फेऱ्या चालवल्या होत्या. त्यानंतर फेऱ्यांच्या संख्येत सातत्याने घट झाली. भाडेतत्त्वावरील शिवशाहीचा



समावेशानंतर यात काही हजार फेऱ्यांची वाढ झाली. मात्र, या गाड्यांचे अपघात सत्र सुरू झाले आणि प्रवासी एसटीपासून दुरावला गेला. करोनानंतर वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर सन २०२२-२३ (ऑक्टोबरपर्यंत) सरासरी एकूण फेऱ्यांची संख्या ७४ लाखांपर्यंत खालावली आहे.

'एसटी महामंडळात मार्गस्थ बिघाडांची आकडेवारी फेरीनिहाय संकलित केली जात नाही. महामंडळात मार्गस्थ बिघाडाचे प्रमाण प्रतिदहा हजार किलोमीटरमागे ठरवले जाते. २०१७-२०१८मध्ये मार्गस्थ बिघाडाचे प्रमाण ०.३१ टक्के होते. सन २०२२-२३मध्ये हा टक्का ०.३७ पर्यंत वाढला असून गेल्या सहा वर्षांतील सर्वाधिक बिघाड एप्रिल ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत झाले आहेत, असे एसटी महामंडळाने माहिती अधिकारात दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे.

# 16 आमदारांना अपात्र ठरवलं गेलं तर?

## महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सुप्रीम कोर्टात सुनावणी

। मुंबई। महाईन्यूज ।

**महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात आता १४ फेब्रुवारीपासून सलग होणार आहे. सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय देणार? याकडे महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. मात्र १६ आमदार जर अपात्र ठरवले गेले तर काय होईल यावर कायदेतज्ज्ञ उल्हास बापट यांनी सविस्तर भाष्य केलं आहे. ठाकरे गट विरूद्ध शिंदे गट हा सामना सुप्रीम कोर्टात गेला आहे. शिवसेना आमचीच हा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे. सुप्रीम कोर्टाने १६ आमदारांना अपात्र ठरवलं तर हा शिंदे सरकारसाठी मोठा झटका असणार आहे.**



सर्वोच्च न्यायालयात आज नक्की क्रमवार कसं काय घडेल ते सांगणं कठीण आहे. मात्र हा निर्णय लवकरात लवकर लागला पाहिजे. छोट्या देशांमध्ये थेट लोकशाही असते. तर भारतासारख्या देशात पक्ष व्यवस्था असते. ही व्यवस्था जपण्यासाठी पक्षांतर बंदी कायदा तयार करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय १६ आमदारांना अपात्र ठरवणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.६ आमदारांना जर कोर्टाने आज अपात्र ठरवलं तर काय होईल?

सर्वोच्च न्यायालयाने जर महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षात १६ आमदारांना अपात्र ठरवलं तर त्यामध्ये एकनाथ शिंदे आहेत. एकनाथ शिंदे जर अपात्र ठरले तर त्यांना मंत्री राहता येणार नाही. त्यामुळे मुख्यमंत्रीपद गेलं तर सरकार अस्तित्त्वात राहणार नाही. याचाच अर्थ असा होईल की कुणालाही बहुमत राहणार नाही आणि महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू होईल. याचा अर्थ असा होईल की गेले सहा महिने हे सरकार काम करतं आहे ते घटनाबाह्य होतं का? हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे असे जे खटले आहेत ते सुप्रीम कोर्टाने लवकर निकाली काढले पाहिजेत. कारण सगळ्याच राज्यांमध्ये पक्षांतर सुरू आहे. निकोप लोकशाही जपायची असेल तर निर्णय लवकर घेतले गेले पाहिजेत असंही बापट यांनी स्पष्ट केलं.

बंडखोर आमदारांना विलीनकरणाचा पर्याय आहे का?

१६ आमदारांना जर सर्वोच्च न्यायालयाने अपात्र ठरवलं तर त्यांच्या पाठोपाठ आलेले सगळे आमदार अपात्र ठरणार. एवढंच नाही तर त्यांना भाजपमध्ये विलीन होण्याचाही कुठलाच पर्याय उरणार नाही. त्यामुळे सुप्रीम कोर्ट याबाबत काय निर्णय देतं ते महत्त्वाचं ठरणार आहे. टीव्ही नाईन मराठीला दिलेल्या मुलाखतीत उल्हास बापट यांनी म्हटलं आहे.

महेश जेठमलानी हे आजच्या सुनावणीत शिंदे गटाची बाजूने उपस्थित होते. तर कपिल सिब्बल हे ठाकरे गटाची बाजूने उपस्थित होते. महाराष्ट्रात २१ जूनला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना आव्हान देत बंड केलं. सुरूवातीला त्यांच्यासोबत १६ आमदार होते. त्यानंतर ही संख्या ४० आणि अपक्ष आमदार १० अशी मिळून एकूण ५० झाली होती. महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आल्याने उद्धव ठाकरेंनी २९ जूनला राजीनामा दिला होता. त्यामुळे महाविकास आघाडी सरकार कोसळलं. तर ३० जूनला मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी तर उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली होती.

### 16 आमदारांना अपात्र ठरवलं गेलं तर सरकार पडणार

**१६ आमदारांना सर्वोच्च न्यायालयाने अपात्र ठरवलं तर सरकार पडणार हे निश्चित आहे. ९१ वी घटना दुरूस्ती झाली त्यात असं लिहिलं आहे की या कायद्याखाली अपात्र झाल्यास मंत्री राहता येत नाही. त्यामुळे मुख्यमंत्री गेले तर सरकार पडणार. कुणालाच बहुमत नसेल तर राष्ट्रपती राजवट ठरणार. एवढंच नाही तर उर्वरित जे आमदार आहेत तेदेखील अपात्र ठरणार आहे.**

# दहशतवाद्यांकडून अयोध्येतील राम मंदिरावर हल्ल्याचा कट?

## नेपाळमार्गे दारूगोळा, आत्मघाती बॉम्बर आणण्याची योजना

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अयोध्येतील राम मंदिरावर पाकिस्तानातील दहशतवादी संघटना हल्ला करण्याची योजना आखत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे राम मंदिरावरील हल्ल्यासाठी या दहशतवादी संघटनांनी नेपाळमार्गे दारूगोळा आणि आत्मघाती बॉम्बर आणण्याची योजना आखली असल्याचीही माहिती समोर आली आहे.

अयोध्येतील राम मंदिरावर पाकिस्तानातील दहशतवादी संघटना हल्ला करण्याची योजना आखत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे राम मंदिरावरील हल्ल्यासाठी या दहशतवादी संघटनांनी नेपाळमार्गे दारूगोळा आणि आत्मघाती बॉम्बर आणण्याची योजना आखली असल्याचीही माहिती समोर आली आहे. या वृत्तसंस्थेने अयोध्येतील राम मंदिरावर पाकिस्तानातील दहशतवादी संघटनेनी हल्ला करण्याचा कट रचल्याचे वृत्त दिले आहे. या वृत्तातील माहितीनुसार, पाकिस्तानस्थित दहशतवादी गट यावेळी अयोध्येतील रामजन्मभूमीवर मोठा हल्ला करण्याची योजना आखत आहेत. जैश-ए-मोहम्मद (JEM) आणि लष्कर-ए-तैयबा (LET) या एकमेव दहशतवादी संघटना आहेत ज्या प्रामुख्याने राम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याची योजना आखत आहेत. या दहशतवादी गटांनी नेपाळमार्गे दारूगोळा आणि आत्मघाती बॉम्बर आणण्याची योजना आखली असल्याची माहिती गुप्तचर सूत्रांनी दिल्याचे या वृत्तात म्हटले आहे.



या वृत्तामधील गुप्तचर सूत्रांच्या माहितीनुसार, 2024 मध्ये मंदिर तयार होण्यापूर्वी रामजन्मभूमीवर हल्ला करणे हे आता या दहशतवादी संघटनांचे मुख्य लक्ष्य बनले आहे. या हल्ल्याचा कट अंमलात आणण्याचा तसेच हिंदू-मुस्लिम जातीय हिंसाचाराची मोठी भूमिका जगासमोर मांडण्याचा या दहशतवादी संघटनांचा हेतू आहे. या संदर्भात पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या काही मजबुरीही समोर आल्याचे गुप्तचर सूत्रांचे मत आहे.

कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये हिंसाचार भडकावण्यात पाकिस्तानची आयएसआय स्पष्टपणे अपयशी ठरली आहे. दहशतवाद्यांच्या घुसखोरीचा पाक लष्कराचा कोणताही प्रयत्न भारतीय लष्कराने यशस्वीपणे रोखला आहे. त्यांचे सर्व बोगदे शोधून काढण्यात आले असून अमली पदार्थांच्या तस्करीवर मोठा अंकुश लावण्यात आला आहे.

# उत्तर भारत गारठला!

## दृश्यमानता अतिशय कमी, अपघातात 4 ठार

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उत्तर आणि ईशान्य भारत सोमवारी थंडीच्या लाटेने गारठला. धुक्याच्या दाट आवरणामुळे या भागातील दृश्यमानता कमी झाली. यातूनच उत्तर प्रदेशच्या उन्नाव जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात चार जण ठार झाले.

दिल्लीत सलग पाचव्या दिवशी थंडीची लाट कायम होती आणि धुक्यामुळे दृश्यमानता केवळ २५ मीटपर्यंत कमी झाली. राजधानीतील थंडीच्या लाटेची तीव्रता इतकी आहे, की सलग पाचव्या दिवशी हिमाचल प्रदेश व उत्तराखंडमधील बहुतांश भागांपेक्षा या शहरात किमान तापमान कमी नोंदले गेले.खराब हवामानामुळे एकूण २६७ रेल्वे गाडय़ा उशिराने धावत होत्या. पाच विमानांचे मार्ग बदलण्यात आले आणि ३० विमानांच्या उड्डाणांना उशीर झाला, असे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.उत्तर प्रदेशातील उन्नाव येथे आग्रा-लखनऊ द्रुतगती मार्गावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाली असल्याने सोमवारी सकाळी एक बस समोरच्या मालमोटारीवर धडकून झालेल्या अपघातात चार जण ठार झाले.

ही बस गुजरातमधील राजकोट येथून नेपाळला जात होती. धुक्याची चादर पंजाब व लगतच्या वायव्य राजस्थानपासून हरयाणा, दिल्ली व उत्तर प्रदेशमार्गे बिहापर्यंत पसरली असल्याचे उपग्रह छायाचित्रांमध्ये दिसून आले.



# एण्ड ऑफ द जर्नी! बिग बॉस फेम रुचिरा जाधवनं पुन्हा दिले ब्रेकअपचे संकेत?



बिग बॉस मराठी 4' मध्ये डॉ.रोहित शिंदे आणि अभिनेत्री रुचिरा जाधव हे रिअल लाईफ कपल सामिल झालं होतं. पण घरात अशा काही गोष्टी घडल्या ज्यामुळे घरातून बाहेर पडताना रुचिरा रोहितवर रागावल्याचं चित्र समोर आलं होतं. दोघांमध्ये गैरसमज झाले, प्रचंड दुरावा आला.. हे नाते पुन्हा सांधले जाईल असे वाटत असतानाच, एक मोठी धक्कादायक पोस्ट समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वीच सर्व सदस्य पुन्हा एकदा घरात आले होते. यावेळी रोहित आणि रुचिरा एकत्र आले. पण दोघांमध्ये असलेली दरी सुस्पष्ट दिसली, तरीही मेघा घाडगे आणि प्रसाद जवादे यांनी त्यांचे नाते जुळवण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दोघांनी एकमेकांना खीर भरवली. त्यावेळी हे नाते पुन्हा जुळले असे अनेकांना वाटले. पण परिस्थिती अजून सुधारलेली नाही, असे तिच्या पोस्ट वरून दिसते.

या पोस्ट मध्ये ती म्हणाली आहे, "एंड ऑफ द चाप्टर, एंड ऑफ द जर्नी, पण माझ्या आयुष्याचा इंटरव्हल पॉइंट. मला आज तुम्हा सर्वांशी एक गोष्ट शेअर करायची आहे, त्यातून तुम्हाला तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळतील. मी इंडस्ट्रीत नसताना हा शो पाहायचे. फॉलो करायचे आणि स्वतः शोमध्ये जाण्याची कल्पना करायचे.

# अन् तापशी पन्नू संतापली...



तापसी पन्नू आणि पापाजी यांचा नॉकझोक पुन्हा एकदा पाहायला मिळाला आहे. तापसी पन्नू म्हणाली की सावध राहा नाहीतर. एवढ्या छोट्या गोष्टीवरून गदारोळ सुरू झाला. पुन्हा एकदा यूजर्स तिला ट्रोल करत आहेत. लोक तिला छोटी जया बच्चन म्हणू लागले.

काही काळापूर्वी बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नूचे पापाराझीसोबत भांडणे खूप दिसली होती. परिस्थिती अशी बनली होती की हा व्हिडिओ इंटरनेटवर खूप ट्रोल देखील झाला होता. आता पुन्हा एकदा तापसी पन्नू आणि पापाराझी आमनेसामने आले, जिथे अभिनेत्री फोटोग्राफर्सना म्हणताना ऐकली - 'सावध राहून तुम्हाला दुखापत होईल, मग तुम्ही म्हणाल की माझ्यामुळे तुम्हाला दुखापत झाली आहे.' आता तापसीचे हे वक्तव्य ऐकल्यानंतर सोशल मीडियावर प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. काही युजर्सने तिला 'ज्युनियर जया बच्चन' म्हटले. जया बच्चन तिच्या कडक वागण्यामुळे अनेकदा ट्रोलही झाल्या आहेत. परवानगीशिवाय फोटो काढणाऱ्यांवर जया बच्चन अनेकदा संतापल्या आहेत. तापसी पन्नूने काय म्हटले तापसी पन्नू मुंबईत कॅज्युअल लूकमध्ये दिसली. त्याच्या हातात पिशव्या दिसल्या. शॉपिंग करून ती गाडीत बसते. यादरम्यान पापाराझी त्याचे फोटो काढू लागतात. तर अभिनेत्री पोज देत नाही. पण ती पापाराझीला म्हणते की तू सावधगिरीने पकडशील, मग तू म्हणशील की ती अभिनेत्यामुळे पकडली गेली. यावर एक कॅमेरापरसनही उत्तर देतो - नाही मॅडम, आम्ही असे नाही.

तापसी पन्नूचा हा व्हिडिओ पाहून यूजर्स दोन भागात विभागले गेले. काहींनी त्याचे समर्थन केले आणि बहुतेकांनी त्याला अहंकारी म्हटले. एका यूजरने लिहिले - जेव्हा हे कॅमेरे त्यांच्या आजूबाजूला दिसणे थांबवतील, तेव्हा त्यांची किंमत कळेल. तुझा खूप अभिमान आहे. तुम्ही सर्वांना एकाच तराजूत तोलू शकत नाही.


# 'सपना चौधरी सोबत माझी तुलना...'



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात एका नावानं नुसता दंगा केलाय... अर्थात ते नाव आहे गौतमी पाटील. गौतमी जरी म्हणत असली की मी जो नृत्य प्रकार करते तो लावणी नाहीच मुळी, तरी तिच्या चाहत्यांनी मात्र तिला लावणीसम्राज्ञी ची उपमा जवळपास दिल्यात जमा आहे.

आज गौतमी पाटीलच्या शो ना टाळ्या,शिट्ट्या अन् गर्दीची झुंबड इतकंच घडत नाही तर इथं नाचता नाचता जीवही लोक गमावताना दिसत आहेत.

आणि याच एका कारणानं अचानक गौतमी पाटील विरोधात टोकाचा सूर निघताना दिसतोय आणि अश्लील हावभाव करत लोकांचे जीव घेण्याचा थेट आरोप करत गौतमीच्या शो वर बंदी देखील आणण्याची मागणी केली जात आहे. यावर प्रतिक्रिया देताना आता गौतमी अनेक मुलाखतीतून म्हणाताना दिसत आहे की, "मी चुकीचं काही करत नाही,मी मागे हटणार नाही आणि मी धमक्यांनाही घाबरत नाही". गौतमीची सध्या हरयाणी क्वीन सपना चौधरीसोबत तुलना होताना दिसत आहे.याविषयी एका वाहिनीच्या मुलाखतीत तिला प्रश्न विचारला असताता ती म्हणाली, "ताईसोबत माझी तुलना होतेय हे चांगलेच आहे. प्रेक्षक प्रेम दाखवत आहेत ही गोष्ट माझ्यासाठी खूप मोठी आहे".गौतमीच्या कार्यक्रमांना बहुतेक वेळा चेंगराचेंगरी होते. असेच एका कार्यक्रमात चेंगराचेंगरी झाल्यानं एका माणसाला जीव गमवावा लागला होता. तसंच, लोक शो दरम्यानं कुठे तरी झाडावर किंवा पत्र्यावर,गॅलरीवर चढतात अन् पडतात.. जखमी होतात हे देखील घडताना दिसत आहे.. इतकंच काय तर स्टेजवर चढून



# हृतिक कसा साजरा करणार आपला 49 वा वाढदिवस?

बॉलीवूड स्टार हतिक रोशनचा आज वाढदिवस आहे आणि हा जन्मदिवस दणक्यात साजरा करण्यासाठी अभिनेत्याकडे खूप कारणं देखील आहेत.

हृतिकने 2022 मध्ये रिलीज झालेल्या 'विक्रम वेधा'या चित्रपटातील आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. अशातच, हृतिक रोशन आता भारतातील पहिला एरिअल ॲक्शन एंटरटेनर सिनेमा 'फाइटर'सह प्रेक्षकांच्या मनावर राज्य करण्यास सज्ज आहे. (HRITHIK ROSHAN

हृतिक रोशन हा अशा अभिनेत्यांपैकी एक आहे जो नेहमीच क्वांटिटीपेक्षा क्वालिटीवर विश्वास ठेवतो. तसेच, कधीही चांगली स्क्रिप्ट न सोडता त्याने तेच चित्रपट केले जे त्याला खरोखर करायचे होते.

वैयक्तिक जीवनातही हृतिक असाच विचार ठेवून आयुष्य जगताना दिसून येतो. कारण हृतिक रोशन आता त्याचा वाढदिवस अशा गोष्टींच्या सान्निध्यात साजरा करू इच्छितो ज्या गोष्टी त्याला मानसिक शांती देतात.वाढदिवसानिमित्त त्याच्या उत्साहाबद्दल विचारले असता, हृतिक म्हणाला, "मी वाढदिवस एक मजेशीर दिवस म्हणून पाहायचो...पार्टी झालीच पाहिजे, लोकांना बोलावलंच पाहिजे..त्याचा आपल्या कामात फायदा होईल असा माझा विचार असायचा. पण आता मी माझा वाढदिवस मला समाधान कशातून मिळेल हा विचार मनात ठेवून साजरा करणार आहे. माझी स्वतःची इच्छा काय आहे.. मी कशानं तृप्त होईल हा विचार माझ्यासाठी महत्त्वाचा असेल या दिवशी..., आणि हे मी सर्व मनापासून म्हणत आहे...हा मी स्वतःवर लादलेला विचार नाही".

# किंग कोहलीचे 'विराट' शतक!

## » गुवाहाटीत टीम इंडियाचा लंकेवर 67 धावांनी दणदणीत विजय

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि श्रीलंका यांच्यादरम्यान मर्यादित षटकांच्या एकदिवसीय मालिकेतील पहिला मंगळवारी (१० जानेवारी) खेळला गेला. गुवाहाटी येथील बारसपारा स्टेडियम येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात भारताचा अनुभवी फलंदाज विराट कोहली याने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली. टीम इंडियाने विराट कोहली आणि उमरान मलिकच्या धारदार गोलंदाजीच्या जोरावर तब्बल ६७ धावांनी श्रीलंकेवर विजय मिळवला. विराटने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील ४५वे शतक पूर्ण करत भारतीय संघाला ३७३ एवढी मोठी धावसंख्या उभारून दिली. हे त्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ७३वे शतक ठरले. त्याला सामनावीराच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.



धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाने अखेरपर्यंत संघर्ष केला. उमरान मलिकने ३ आणि सिराजने २ विकेट्स घेतल्या. मोहम्मद सिराजने अविष्का फर्नांडो व कुसल मेंडिसला बाद केले. सलामीवीर पथूम निसंका आणि चरिथ असलंका यांनी श्रीलंकेचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु उमरान मलिकच्या वेगासमोर तेही नतमस्तक झाले. चरिथ असलंका २३ धावांवर उमरानच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. उमरानने आजच्या सामन्यात १५६ किमी वेगाने चेंडू टाकला अन् एकदिवसीय क्रिकेटमधील कोणत्याही भारतीय गोलंदाजाने टाकलेला हा सर्वात वेगवान चेंडू ठरला. निसंका व धनंजया डी सिल्वा ही जोडी भारतावर वरचढ ठरत होती. निसंकाने अर्धशतक झळकावताना ७२ धावांची भागीदारी केली. मोहम्मद शमीने आपला अनुभव वापरत धनंजयला ( ४७) बाद केले. उमरानच्या वेगवान गोलंदाजीवर फटका मारण्याचा निसंकाचा प्रयत्न अपयशी ठरला अन् त्याचा अक्षर पटेलने सोपा झेल घेतला. निसंका ८० चेंडूंत ११ चौकारांसह ७२ धावांवर बाद झाला. वानिंदू हसरंगाने फिरकीपटू युजवेंद्र चहलच्या षटकात दोन षटकार आणि एक चौकार अशा धावा कुटल्या. पण, चहलने गुगली टाकून वानिंदूला आणखी एक उंच फटका मारण्यास भाग पाडले. श्रेयस अय्यर व उमरान झेल टिपण्यासाठी समोरासमोर आले, परंतु अय्यरने चेंडूवर नजर कायम राखताना झेल घेतला. वानिंदू ७ चेंडूंत १६ धावा करून माघारी परतला. त्यानंतर श्रीलंकेचा डाव गडगडला अन् भारताने विजय मिळवला. कर्णधार दासुन शनाकाने संघर्ष दाखवताना झुंजार शतक पूर्ण केले. परंतु श्रीलंकेला हार मानावी लागली. त्यांनी ८ बाद ३०६ धावांपर्यंत मजल मारली. शनाकाने ८८ चेंडूंत १२ चौकार व ३ षटकारांसह नाबाद १०८ धावा केल्या.

तत्पूर्वी, श्रीलंकेच्या दासुन शनाकाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि त्यांना तो खूप महागात पडला. विराट कोहलीच्या शतकाने अक्षरशः पाहुण्या संघाला दिवसा तारे दाखवले. रोहित शर्मा व विराट कोहली यांचे संघातील पुनरागमन आगामी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. भारतातच होणाऱ्या या विश्वचषकाच्या स्पर्धेसाठी टीम इंडियाची आजपासून खऱ्या अर्थाने अंतिम टप्प्यातील सुरुवात झाली. रोहित शर्मा व शुबमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी १४३ धावांची दमदार भागीदारी करताना संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी वैयक्तिक अर्धशतक पूर्ण केले. रोहितचे शतक थोडक्यात हुकले, परंतु त्याने विश्वविक्रमासह अनेक विक्रम मोडले. या सामन्यासाठी भारताने जेव्हा अंतिम अकरा खेळाडूंची नावे जाहीर केली, तेव्हा सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. मागील एकदिवसीय सामन्यात द्विशतकी खेळी करणाऱ्या इशान किशनला बाकावर बसवून शुबमन गिलला संधी देण्यात आली. यावरून सोशल मीडियावर वादाला सुरूवात झाली. गिलला का घेतले असा प्रश्न चाहत्यांनी विचारला, मात्र गिलनेही त्यांना नाराज न करता जबरदस्त सुरूवात करत अर्धशतकी खेळी केली.

# हॉकीमध्ये पुण्याचा दुहेरी धमाका!

## » 18 विविध वजनी गटात राज्यभरातील 45 संघांचे 900 पैलवान भिडणार




### महिलांमध्ये पुण्याचे वर्चस्व

»"कबड्डीत महिला गटाच्या अंतिम फेरीत पुण्याने मुंबई उपनगर संघाचे आव्हान ३९-१९ असे मोडून काढले. पूर्वार्धात ते १८ विरुद्ध ९ असे आघाडीवर होते. अंकिता जगताप व साक्षी काळे यांनी छान खेळ केला.

### टेबल टेनिसमध्ये ठाण्याचा स्मॅश

»बालेवाडी क्रीडा संकुलाच्या इनडोअर हॉलमध्ये पार पडलेल्या टेबल टेनिस स्पर्धेत ठाण्याने पुरुष आणि महिला अशा दोन्ही गटांच्या विजेतेपदांवर आपले नाव कोरले. महिला एकेरीत नाशिकच्या सायली वाणीने सहकारी तनिषा कोटेचावर ४-२ असा विजय मिळवत सुवर्णपदक पटकावले.

।पुणे । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**पुण्याच्या दोन्ही संघांनी माराष्ट्र राज्य ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेतील हॉकी या खेळामध्ये दुहेरी धमाका केला.**

**पुण्याच्या पुरुष आणि महिला संघांनी रविवारी दोन्ही गटांत कोल्हापूर संघांवर मात करत सुवर्णपदकांना गवसणी घातली.**

पुणे पुरुष संघाने कोल्हापूर संघाचा १४ - १ असा धुव्वा उडवला, तर पुण्याच्या महिला संघाने उत्कर्षा काळेच्या चार गोलांच्या जोरावर कोल्हापूरचा ६-० असा पराभव केला. पुरुष गटाच्या ब्राँझपदकाच्या लढतीत नांदेडने जळगाववर २-१ असा विजय संपादन केला, तर महिला गटात औरंगाबादने सातार्‍यावर १२-० अशी मात करून तिसरे स्थान पटकावले.

### मुंबई शहरला निसटते विजेतपद

कबड्डी या खेळातील पुरुषांच्या गटात मुंबई शहर संघाने मुंबई उपनगर संघाला दोन गुणांनी पराभूत केले आणि अजिंक्यपदावर नाव कोरले.

मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन्ही पारंपरिक प्रतिस्पर्धी विजेतेपदासाठी लढत असल्यामुळे अंतिम सामन्याबाबत कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. मध्यंतराला दोन्ही संघ प्रत्येकी आठ गुणांवर होते. उत्तरार्धातही शेवटपर्यंत चुरस पाहावयास मिळाली. अखेर मुंबई शहर संघाने हा सामना ३०-२८ असा दोन गुणांनी जिंकला.